अत्यंत महत्वाचे व तातडीचे

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित विद्यापीठ)

## (सामान्य प्रशासन विभाग)

जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, कॅम्पस चौक ते अंबाझरी टी–पॉईंट मार्ग, नागपूर – ४४० ०३३
दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२९५६३०२ ई–मेल: arga@nagpuruniversity.nic.in

क्रमांक: रातुमनावि/साप्र/२०/स/२९४४
दिनांक : ११ मे २०२०

## परिपत्रक

**विषय: कोव्हिड–१९ च्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत विद्यार्थ्यांना परीक्षा व शैक्षणिक विषयक मार्गदर्शन व शंकाचे निरसन करण्यासाठी विद्यार्थी मार्गदर्शन व शंका निरसन कक्ष स्थापन करण्यात आल्याबाबत.**

संदर्भ : १. शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागचे पत्र क्रमांक संकीर्ण–२०२०/प्र.क्र.१२३/विशि–३, दिनांक ८ मे २०२०.
२. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक यूएनआय/२०२०/ बैठक/विशि–१/४१३१ A, दिनांक ८ मे २०२०

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, कोव्हिड–१९ च्या प्रादुर्भावामुळे व तद्नुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन करण्याकरीता मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांनी गठीत केलेल्या राज्यस्तरीय समितीचा अहवाल शासनाने स्विकृत केला असल्याचे शासनाद्वारे संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदर अहवालातील शिफारस क्रमांक ८ मध्ये, "कोव्हिड–१९ च्या उद्रेकामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत विद्यार्थ्यांना परीक्षा आणि त्यांच्या शैक्षणिक हितासाठी मार्गदर्शन मिळावे यासाठी विद्यापीठामध्ये विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष आणि हेल्पलाईन सुरु करण्यात यावी. परीक्षांसाठी तसेच शैक्षणिक वेळापत्रकाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि सहाय्य मिळणेसाठी जिल्हानिहाय समुपदेशनाची सोय सुध्दा उपलब्ध करुन देण्यात यावी" असे नमूद केले आहे.

उपरोक्तनुसार मा. कुलगुरु महोदयांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील विद्यार्थ्यांना उद्भवणाऱ्या समस्यांचे व शंकांचे निरसन करण्यासाठी **विद्यार्थी मार्गदर्शन व शंका निरसन कक्षाची स्थापना** खालीलप्रमाणे केली आहे.

| अ.क्र. | नाव व पद | भ्रमणध्वनी क्रमांक | ई–मेल |
|---|---|---|---|
| १. | डॉ. प्रफुल्ल साबळे,<br>संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ | ७९७२८२६६२८ | coe@nagpuruniversity.nic.in<br>prafullasable@gmail.com |
| २. | डॉ. नविन मुंगळे,<br>उपकुलसचिव, परीक्षा उपरांत | ९५११९१०५७५ | navmungle@gmail.com |
| ३. | श्री बिंदुप्रसाद शुक्ला,<br>सहायक कुलसचिव, सामान्य परीक्षा | ९८६०४८२०२१<br>७७५५९८६६८१ | bindupshukla@gmail.com |

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील विद्यार्थ्यांना परीक्षा व शैक्षणिक विषयक कोणतीही समस्या व शंका उद्भवल्यास त्यांनी आपल्या समस्या व शंकांचे निराकरण करण्यास्तव वरील नमूद अधिकाऱ्यांच्या भ्रमणध्वनीवर कृपया संपर्क साधावा किंवा ई–मेल पाठवून माहिती घ्यावी.

(डॉ. नीरज खटी)
प्रभारी कुलसचिव

१. विद्यापीठ शैक्षणिक विभागाचे सर्व विभाग प्रमुख.
२. विद्यापीठ संचालित व संलग्नित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य व संचालक.
यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक आपल्या विभाग/महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्याची आवश्यक कार्यवाही घ्यावी.

(गणेश कुमकुमवार)
अधीक्षक (सा.प्र.)
अति. प्रभार